INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 10 | NOVEMBER - 2021

# स्त्री सुधारणा चळवळीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान

**Prasad Dilip Nakhate**
**M. Phil Student, Department of History, University of Mumbai.**

**प्रस्तावना :**



प्राचीन काळापासून मनुस्मृती धर्म ग्रंथाच्या अध्ययना प्रमाणे स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवले होते. मनुस्मृतीच्या नियमानुसार स्त्री हि गुलाम असून तिला वेद अध्ययन करणे, तसेच तिला कोणतीही संपत्ती प्राप्त करण्याचा अधिकार नव्हता. स्त्री हि पुरुषाची दासी आहे असे मनुस्मृती मध्ये सांगण्यात आले होते. अशा प्रकारे, स्त्रीला अतिशय अपमानास्पद जीवन जगावे लागत होते. १९ व्या शतकात पेशवाई काळ संपल्यानंतर देखील मनुस्मृतीने सांगितलेले नियम चालूच राहिले याकाळात सुद्धा स्त्री हि एक दासी आणि घरात मुलीचा जन्म अपशकून मानला जात होता. तसेच, स्त्रीला घराबाहेर जाण्याचा अधिकार नाकारण्यात आला होता.[1] स्त्रियांना फक्त चूल आणि मुल सांभाळण्याकरता, तसेच उपभोगाची वस्तू म्हणून समाजात स्थान होते. मनुस्मृती धर्म ग्रंथामध्ये लादलेल्या जाचक अटींमुळे स्त्रियांची अवस्था दयनीय झाली होती.

**उद्दिष्टे :**

स्त्रियांच्या सामाजिक जीवनावर प्रकाश टाकणे. स्त्रियांवर लादण्यात आलेल्या अनिष्ट रूढी परंपरांचा अभ्यास करणे. स्त्रियांच्या उद्धारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेल्या भूमिकेचा आढावा घेणे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेतील स्त्री सुधारणा विषयक केलेल्या तरतुदींचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती :**

भारतीय राज्यघटनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री सुधारणेविषयी केलेल्या कायदे आणि तरतुदींचा सूक्ष्म अध्ययन पद्धतीचा वापर करून स्त्री सुधारणा कायद्यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय – अत्याचार यांचा इतिहास हा फार जुना आहे. तसेच, जसजशी पुरुषप्रधान संस्कृती विकसित झाली, तसतशी स्त्रियांवरची बंधने अधिक वाढत गेली. जातीव्यवस्थेला धर्माचा अधिकार

मिळाला तसाच अधिकार स्त्रियांवरील अनिष्ठ रूढी परंपराना मिळाला. धर्माच्या बंधनामुळे स्त्रियांचे अधिकार नाकारण्यात आले. स्त्रियांना समाजात माणूस म्हणून वावरण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळे, स्त्री परावलंबी झाली होती. यामुळे स्त्रियांचे समाजातील स्थान दुय्यम झाले होते[2] अशाप्रकारे, स्त्रीला आपले जीवन जगताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. समाजात पुरुषांचे प्राबल्य मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे, स्त्रियांचे समाजातील स्थान कमी होऊ लागले होते.

धर्माचा आधार देऊन योनिशुचित म्हणून बालविवाह, सतीची चाल, पुनर्विवाह बंदी, जरठकुमारी विवाह या रूढी परंपरा उदयाला आल्या होत्या.[3] धर्मसंस्थेमुळे स्त्रियांचे आयुष्य अतिशय कमकुवत झाले. समाजाने आणि धर्माने स्त्रीला दुय्यम ठरवले तसेच, स्त्रीला कुटुंबातून नाही तर समाजापासून दूर ठेवण्यात आले. स्त्री हि एक उपभोगाची वस्तू म्हणून तिच्याकडे पाहीले जाऊ लागले.

## मनुस्मृती :

मनुस्मृतीमध्ये स्त्रियांच्या बाबतीत काही मते मांडलेली आहेत. मनुस्मृतीच्या अध्याय – ९(१४) - स्त्रियांनी स्वतःच्या सौंदर्याची फिकीर करू नये किंवा विशिष्ट वयावर लक्ष केंद्रित करू नये. तो पुरुष आहे कि कुरूप आहे कि सुंदर आहे याचा विचार स्त्रियांनी करू नये. फक्त पुरुष आहे एवढाच विचार करावा. ९(१७) - स्त्रियांची निर्मिती करताना त्यांना प्रेम, जागा, दागिने, पापी, वासना, क्रोध, बेईमानी, व्याभिचार व दुराचरण इ. विशेषणे मनुने स्त्रियांना लावली आहेत. ९(२) - दिवस आणि रात्र २४ तास कुटुंबातील पुरुषांच्या नजरेत स्त्रीला ठेवले पाहिजे जर कामवासनेचा आनंद हवा असेल तर तिला एकाच पुरुषाच्या नियंत्रणाखाली ठेवले पाहिजे. ९(३) - स्त्रीचे बालपणी तिचा पिता रक्षण करतो, तरुणपणी पती आणि वृद्ध वयात तिची मुले संरक्षण करतात. कोणत्याही काळात स्वतंत्र राहण्यास स्त्री योग्य नाही. ४(१४७) - मुलीने, तरुण स्त्रीने किंवा वयस्कर स्त्रीने कोणतीही गोष्ट स्वतःच्या घरात स्वतःच्या स्वतंत्र बुद्धीने करू नये. ५(१४८) - बालपणात पित्याचा स्त्रीवर अधिकार असतो तरुणपणात पतीचा अधिकार असतो, पती निधनानंतर तिच्या मुलांचा अधिकार असतो. परंतु कधीही ती स्वतंत्र राहू शकत नाही. ५(१४९) - स्त्रीने स्वतःला पिता, पती व पुत्र यांच्यापासून अलग, वेगळे स्वतंत्र समजू नये. तसे तिने केल्यास तिला तृच्छ मानले जाईल. ९(४५) एकदा स्त्रीने विवाह केला कि, ती स्त्री कधीही स्वतंत्र राहू शकत नाही.[4] मनुस्मृतीमध्ये नमूद केलेल्या अध्यायांमुळे बालविवाह, सतीप्रथा, बहुपत्नीत्व, केशवपन, यांसारख्या अनिष्ट रूढी स्त्रियांवर लादण्यात आल्या होत्या. तसेच, ती पूर्णपणे आपल्या पिता, पती व मुलांवरच अवलंबून आहे, असे सांगण्यात आले होते.

## बालविवाह :

लहान वयामध्ये मुलीचा विवाह तिच्या पेक्षा वयाने मोठया असलेल्या व्यक्तीशी केला जात असे. साधारण मुलीचे वय बारा ते तेरा वर्ष असायचे आणि त्यापेक्षा दुप्पट वय तिच्यासोबत विवाह करणाऱ्या व्यक्तीचे असे. तसेच, या काळात एका पेक्षा अधिक विवाह करण्याची प्रथा अस्तित्वात होती. वयाने मोठया असलेल्या व्यक्तीने लहान मुलीशी लग्न केले तर कालांतराने वय वाढले कि, त्यांना पुन्हा लग्न करण्याचा मोह आवारत नसे. यामुळे, बालविवाह हि प्रथा वाढत होती.[5] अशाप्रकारे, बालविवाह या प्रथेमुळे स्त्रियांना आपले जीवन मनासारखे जगता येत नव्हते. अगदी लहान वयात विवाह केल्यामुळे त्यांचे आयुष्य कमी होत चालले होते.

## सतीप्रथा :

आपल्या पतीच्या निधनानंतर जिवंतपणे त्याच्या चितेवर उडी घेणे या पद्धतीला सती जाणे असे म्हणत. स्त्रियांची इच्छा नसताना सुद्धा त्यांना जबरदस्तीने सती जाण्यास सांगत.[6] धर्माच्या दबावाखाली अडकलेल्या स्त्रीला मनापासून जरी वाटत नसले तरी तिच्या मना विरुद्ध तिला सती जावे लागत होते. तसेच, पतीच्या निधनानंतर सती जाणे म्हणजे आपल्याला देवाजवळ स्थान मिळते अशी समज त्यांच्या मनात निर्माण झाली होती. अशाप्रकारे, संपूर्ण समाजावर मनुस्मृती या धर्मग्रंथाचा पगडा असल्याचे दिसून येते

**बहुपत्नीत्व :**

समाजामध्ये अनेक बायका करण्याची पद्धत रूढ होती. मुस्लीम समाजामध्ये चार ते पाच विवाह करण्याची पद्धत होती. सरदार, जमीनदार वर्ग तसेच वतनदार वर्ग हे एकापेक्षा अनेक विवाह करत. तसेच घराबाहेर अनेक बायका ठेवण्याची प्रथा मोठया प्रमाणात होती. अशामुळे प्रत्येक कुटुंबामध्ये वाद-विवाद होत असत. गरिबीमुळे या काळात मुलीचा बाप आपल्या मुलीला पैशांच्या अडचणीसाठी तिला अतिशय कमी पैशांमधे बाजारामध्ये विकत असत.[7] बहुपत्नीत्व प्रथेमुळे स्त्रियांचा समाजातील दर्जा कमी होऊन तिच्याकडे चैनीचे साधन म्हणून पहिले जात होते. परिणामी, वेश्या व्यवसाय या काळात वाढत होता.

**केशवपन :**

पतीच्या निधनानंतर विधवा झालेल्या स्त्रीचे प्रत्येक महिन्याला डोक्यावरचे केस काढळे जात त्यालाच केशवपन म्हटले जाई. यामुळे स्त्रियांचा चेहरा विद्रूप दिसत असे या प्रथेचा मुख्य उद्देश होता कि, तिच्याकडे कोणाचेही लक्ष जाऊ नये.[8] केशवपन या प्रथेमुळे लहान वयात विधवा झालेल्या स्त्रियांना आपले केस काढावे लागत होते. त्यामुळे, त्यांचा चेहरा विद्रूप दिसत असे आणि त्यांना त्यांचे संपूर्ण आयुष्य हे नैराश्य मध्ये जगावे लागत होते. मनुस्मृती धर्माने ठरविलेलल्या या अनिष्ट प्रथेमुळे स्त्रियांचे मानसिक मनोबल कमी होत चालले होते.

**स्त्री सुधारणा चळवळीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान :**

स्त्री चळवळीचा अभ्यास करताना भारतीय समाजरचना कशा प्रकारची होती याचा विचार करत असताना आपल्याला असे दिसून येते कि, वैदिक काळापासून स्त्रीवादी चळवळ उदयास आली. भारतातील स्त्रीवादी चळवळ पाश्च्यात्य स्त्रीवादातून सुरु झाली. परंतु, खऱ्या अर्थाने भारतामध्ये स्त्री चळवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे विकसित झाली. मनुस्मृती या धर्मग्रंथाने भारतीय स्त्रियांची दयनीय अवस्था केली. मनुस्मृती या धर्मग्रंथाने भारतातील समाजव्यवस्थे मध्ये अनेक कायदे केले होते. यामध्ये जातीप्रथा, अस्पृश्यता, वर्णव्यवस्था, स्त्रीदास्यत्व अशा प्रकारचे जाचक कायदे लादले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, स्त्रियांना पशुप्रमाणे जीवन जगावे लागत होते. तसेच, हे कायदे स्त्रियांना असमान ठरविणारे होते. त्यांना अपमानास्पद वागणूक मिळत होती. त्यामुळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ डिसेंबर, १९२७ रोजी महाड मधील चवदार तळ्याजवळ मनुस्मृती या धर्मग्रंथांचे दहन केले. यामुळे संपूर्ण भारतात २५ डिसेंबर हा दिवस स्त्रियांच्या मुक्तीचा दिवस म्हणून ओळखला जातो[9] अशाप्रकारे मनुस्मृतीने केलेले कायदे हे स्त्रीला गुलाम बनविणारे होते. स्त्रियांना मुलभूत अधिकारांपासून दूर ठेवणारे होते म्हणूनच, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृती जाळून स्त्रीमुक्ती चळवळीचा नवा इतिहास घडविला.

**हिंदू कोड बिल :**

विषमतेवर आधारित असलेल्या हिंदू समाजव्यवस्थेतील कायदा म्हणजे मनुस्मृती या मनुस्मृतीला विरोध करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिल तयार करून ते संसदेमध्ये मांडले. त्यासाठी २० जणांची सिलेक्ट कमिटी ९ एप्रिल, १९४८ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली तयार करण्यात आली होती. हिंदू कोड बिलाच्या मार्फत हिंदू परंपरेवर आधारित असलेल्या भारतीय समाजातील विषमता नष्ट करणे तसेच, स्त्रियांना समान न्याय अधिकार मिळवून देणे, असे उद्दिष्ट डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे होते. त्यामुळे स्त्रियांना दत्तक विधान विवाह विच्छेद, घटस्फोट, घटस्फोटाचा अधिकार, वारसा अधिकार व पोटगी अशाप्रकारचे अधिकार १२ ऑगस्ट, १९४८ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायदे मंडळापुढे हिंदू कोड बिलामध्ये सादर केले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सादर केलेल्या हिंदू कोड बिलाला १९५१ ला पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्थगिती देऊन नामंजूर केले. परंतु, हिंदू कोड बिलाचे महत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना माहित होते आणि म्हणूनच पुढे विशेष विवाह कायदा १९५५, हिंदू विवाह कायदा १९५५, हिंदू उत्तराधिकारी कायदा १९५६, हिंदू दस्तक ग्रहण आणि निर्वाह कायदा १९५६, हिंदू दत्तक ग्रहण कायदा १९५८ असे विविध कायदे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले.[10] डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांच्या समान न्याय हक्कासाठी हिंदू कोड बिल कायदे मंडळापुढे सादर केले होते. परंतु, ते नामंजूर झाल्यामुळे त्यांनी हार मानली नाही आणि आपले प्रयत्न चालूच ठेवले. त्यांच्या प्रयत्नांमुळेच भारतीय संविधानात त्यांनी स्त्रीमुक्तीसाठी तरतुदी केल्या.

**स्त्री मुक्तीसाठी भारतीय संविधानातील तरतुदी :**

**कलम १४** : राज्य कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायदयापुढे समानता अथवा कायदयांचे समान संरक्षण नाकारणार नाही. **कलम १५** (१) राज्य केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान, या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल, होईल अशाप्रकारे भेदभाव करणार नाही. (३) या अनुछेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, स्त्रिया व बालके यांच्याकरता कोणत्याही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही. **कलम १६** (१) राज्याच्या नियंत्रणाखाली कोणत्याही पदावरील सेवायोजन किंवा नियुक्ती यासंबधीच्या बाबींमध्ये सर्व नागरिकांस समान संधी असेल. (२) कोणताही नागरिक धर्म, वंश, जात, लिंग, कुळ, जन्मस्थान, निवास, या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून राज्याच्या नियंत्रणाखाली कोणतेही सेवायोजन किंवा पद यांच्याकरिता अपात्र असणार नाही, अथवा त्यांच्याबाबतीत त्याला प्रतिकूल असा भेदभाव केला जाणार नाही. **कलम ३८ (१)** ज्या समाजव्यवस्थेमध्ये सामाजिक, आर्थिकव राजनैतिक न्याय हा राष्ट्रीय जीवनाच्या सर्व संस्थाना प्राणभूत होईल अशी समाजव्यवस्था, होईल तितक्या परिणामकारक रीतीने करून लोककल्याणाचे संवर्धन करण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील. **कलम ३९** राज्य हे, विशेषता पुढील गोष्टी साध्य करण्याचा दिशेने आपले धोरण आखील – (क) उपजीविकेचे पर्याप्त साधन मिळण्याचा अधिकार स्त्री व पुरुष नागरिकांना सारखाच असावा; (घ) पुरुष व स्त्रिया या दोघांनाही समान कामाबद्दल समान वेतन मिळावे; **कलम ३९ क** राज्य हे कायदयाची यंत्रणा राबवताना समान संधीच्या तत्वावर न्यायाची अभिवृद्धी होईल याची निश्चिती करील, आणि विशेषतः आर्थिक किंवा अन्य नि:समर्थतामुळे कोणत्याही नागरिकाला न्याय मिळवण्याची संधी नाकारली जाणार नाही याची शाश्वती देण्यासाठी अनुरूप विधी विधानाद्वारे किंवा योजनांद्वारे किंवा अन्य कोणत्याही मार्गाने विधी विषयक साहाय्य मोफत उपलब्ध करून देईल. **कलम ४२** राज्य हे कामाबाबत न्याय व मानवोचीत परिस्थिती उपलब्ध करण्यासाठी व प्रसूती साहाय्यासाठी तरतूद करील.[11]

स्त्रियांवर केल्या जाणाऱ्या अन्यायाला रोखण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानातून कलम १४ मध्ये समानता व कायदयाचे समान संरक्षण नमूद केले. तसेच कलम १५ मध्ये धर्म, वंश, जात, लिंग, या आधारावर भेदभाव केला जाणार नाही, अशी तरतूद केली. अशाप्रकारे संविधानातून तरतुदींमध्ये समान संधी, हक्क, अधिकार पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही बहाल केले.

## निष्कर्ष :

भारतीय स्त्रियांची परिस्थिती प्राचीन काळापासून दयनीय होती. कारण स्त्रियांना अनीष्ट रूढी – परंपरांच्या आधारावर शिक्षण, स्वतंत्रता, समानता या अधिकारांपासून दुर ठेवले गेले होते. मनुस्मृतीच्या अध्यायांमध्ये, स्त्री हे चैनीचे साधन आहे असे संगाण्यात आले होते. तसेच तिला स्वतंत्रपणे राहण्याचे अधिकार नाकारले होते. म्हणूनच स्त्रीला गुलाम करणाऱ्या धर्मग्रंथाला २५ डिसेंबर १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी जाळून टाकले. तसेच स्त्रियांना समान न्याय व अधिकार मिळवून देणाऱ्या हिंदू कोड बिलाची तरतूद ९ एप्रिल, १९४८ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली परंतु, १९५१ ला हिंदू कोड बिलाला स्थगिती देवून स्त्रियांच्या कल्याणासाठी तयार केलेल्या तरतुदींवर गदा आणली. तरीही २६ जानेवारी, १९५० रोजी अंमलात आणलेल्या भारतीय संविधानात कलम १४, कलम १५, कलम १६, कलम ३८, कलम ३९, कलम ४२, च्या अंतर्गत स्त्रियांना समानता, कायदयाचे समान संरक्षण, समान संधी, समान वेतन, प्रसूती सहाय्य यांसारख्या तरतुदी देवून स्त्रियांना हक्क व अधिकारांना संरक्षण दिले.

## संदर्भसूची :


१. कठारे अनिल, *आधुनिक भारताचा इतिहास,* विदया बुक्स पब्लिकेशन, औरंगाबाद, जून २०१३.
२. खैरमोडे भवानराव चांगदेव, *डॉ. बाबासाहेब आंबेडकर खंड १०,* सुगावा प्रकाशन पुणे, १४ एप्रिल २०१७.
३. लुलेकर प्रल्हाद, *अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा,* सायन पब्लिकेशन्स, पुणे, २०१४/२०१५.
४. आंबेडकर बाबासाहेब, *क्रांती आणि प्रतिक्रांती,* सुगत प्रकाशन, नागपूर, १२ डिसेंबर २००८.
५. वाघ संदेश, *आंबेडकरी चळवळीचा इतिहास,* संदेश पब्लिकेशन, मुंबई, ६ डिसेंबर २०१२.
६. शेणोलीकर ह. श्री. आणि देशपांडे प्र. न., *महाराष्ट्राचा सामाजिक- सांस्कृतिक इतिहास,* के सागर पब्लिकेशन, १५ ऑक्टोबर २००६.
७. गाठाल एस. एस., *आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास,* कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, जानेवारी २०१९.
८. आंबेडकर बाबासाहेब, *भारताचे संविधान,* समता प्रकाशन, नागपूर, २६ नोव्हेंबर २०१६.


[1] डॉ. अनिल कठारे, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विदया बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जून २०१३, पृष्ठ क्र ६८ - ६९.

[2] डॉ. प्रल्हाद लुलेकर, अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा, सायन पब्लिकेशन्स, पुणे, २०१४/२०१५, पृष्ठ क्र ७८.

[3] डॉ. प्रल्हाद लुलेकर,अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा, सायन पब्लिकेशन्स, पुणे, २०१४/२०१५, पृष्ठ क्र ७८.

[4] डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांती आणि प्रतिक्रांती, सुगत प्रकाशन, नागपूर, १२ डिसेंबर २००८, पृष्ठ क्र २१७ - २१८.

[5] प्रा. ह. श्री. शेणोलीकर, डॉ. प्र. न. देशपांडे, महाराष्ट्राचा सामाजिक - सांस्कृतिक इतिहास, के सागर पब्लिकेशन, ऑक्टोबर २००६ पृष्ठ क्र ३०२.

[6] डॉ. अनिल कठारे, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विदया बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जून २०१३, पृष्ठ क्र ७०.

[7] प्राचार्य डॉ. एस. एस. गाठाल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, जानेवारी २०१९, पृष्ठ क्र १०.

[8] प्राचार्य डॉ. एस. एस. गाठाल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, जानेवारी २०१९, पृष्ठ क्र १०.

[9] डॉ. संदेश वाघ, आंबेडकरी चळवळीचा इतिहास, संदेश पब्लिकेशन, मुंबई, ६ डिसेंबर २०१२, पृष्ठ क्र १९४.

[10] चांगदेव भवानराव खैरमोडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर खंड १०, सुगावा प्रकाशन पुणे, १४ एप्रिल २०१७, पृष्ठ क्र ७०, ७१.

[11] शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारताचे संविधान, समता प्रकाशन, नागपूर, २६ नोव्हेंबर २०१६, पृष्ठ क्र १२९ - १३०,१३३ -१३९.